या साइटच्या होमपेजवर सावकार
म आपली भूमिका स्पष्ट केली आहे.
जवर संग्रहित केलेल्या या म्हणींची
अकारविल्हे केली आहे. त्यासाठी
रलेली पाटीची कल्पनाही सूचक
अक्षरावर क्लिक केल्यानंतर त्या
ने सुरू होणाऱ्या म्हणी पाहता

हात तुम्हाला भर घालायची
प्रत्येक पानाच्या तळाशी
खास लिंक दिली आहे. त्यावर
रून माहीत असलेल्या म्हणी
साठी पाठवू शकता. असं
देणाऱ्यांचं नाव होमपेजवरच्या
लीत लिहिलं जातं.
या या अमोल ठेव्याच्या
ी प्रत्येकाने या
सहभागी व्हायला

– नील वेबर
el_weber@
imes.com

***गायक-संगीतकार वसंत आजगावकर यांच्या संगीतसाधनेचं हे सुवर्ण महोत्सवी वर्ष. १९५७ मध्ये गीत रामायणापासून सुरू झालेला आजगावकरांचा संगीतप्रवास 'गीत महाभारत', 'गीत शिवायन', 'गीत दत्तात्रेय' अशा विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून पुढे जात राहिला. 'संगीत ही एक न संपणारी साधना आहे' असं मानणाऱ्या आजगावकरांशी केलेली ही बातचीत...***

# संगीतसाधनेचा सुवर्ण महोत्सव



संगीतकार सुधीर फडके यांच्या गीतरामायणाच्या वाद्यवृंदातल्या सह-गायकांपैकी एक म्हणजे वसंत आजगावकर. पण त्यांची गायकी केवळ सह-गायकापुरती मर्यादित राहिली नाही. गाण्याच्या स्वतंत्र मैफली करण्याबरोबच रेडिओ, एचएमव्ही आणि टीव्ही ही माध्यमंसुद्धा आजगावकरांनी हाताळली.

१९५८ पासून आकाशवाणीवर स्वतंत्रपणे गायला सुरुवात केल्याची आठवण आजगावकर सांगतात. रसायनशास्त्राची पदवी घेतल्यानंतर आजगावकर सेंच्युरी रेयॉनमध्ये नोकरी करत होते. ते म्हणाले, 'नोकरी तर आवश्यकच होती, पण नोकरी करताना गाणं सोडलं नाही. जमेल तेवढं आणि तसं गाण्याचं शिक्षण चालू ठेवलं.' संगीतकलेला साक्षात देवाची उपासना मानणारे आजगावकर पैसा, प्रसिद्धी, ग्लॅमर यामागे कधी धावले नाहीत. 'मला जमेल तेवढी संगीताची आराधना मी करत राहिलो. त्यातून मिळणारं समाधान लाख मोलाचं आहे.' मात्र हल्ली कलेचा बाजार मांडला जातो याची टोचणी त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होते.

यशवंत देव, दशरथ पुजारी, प्रभाकर पंडित, प्रभाकर जोग, श्रीनिवास खळे आदी अनेक संगीतकारांची गाणी आजगावकरांनी गायली आहेत. त्यांच्या गाजलेल्या गाण्यांची ध्वनिफित एचएमव्हीने काढली आहे.

बाबुजी-गदिमांच्या गीतरामायणाचा मोठा प्रभाव आजगावकरांवर असल्याचं जाणवतं. गीतरामायण अमराठी लोकांपर्यंत पोहोचलं पाहिजे या तळमळीने आजगावकरांनी हिंदीतून गीतरामायणाचे प्रयोग करायला सुरुवात केली. गीतरामायणाच्याच धर्तीवर पुढे 'गीतमहाभारत', 'गीतशिवायन', 'गीतदत्तात्रेय' अशा कार्यक्रमांतून आजगावकरांची गायकी रसिकांना रिझवत राहिली.

गायकीबरोबरच मर्ढेकरांच्या कविता संगीतबद्ध करून आजगावकरांनी आपल्यातल्या संगीत दिग्दर्शकाची चुणूक दाखवून दिली. 'आली कुठूनशी कानी, टाळ-मृदुंगाची धून' हे आजगावकरांनी संगीतबद्ध केलेलं गाणं बरंच लोकप्रिय झालं. गायक आणि संगीतकार या दोन्ही भूमिकांतून ते या क्षेत्रात कार्यरत राहिले. 'साईचरित्रगान' ही त्यांनी संगीतबद्ध केलेली गाणी आजही आवडीने ऐकली जातात.

काळानुरूप संगीतात आलेल्या अनेक प्रवाहांचं आजगावकरांनी स्वागतच केलं. ते सांगतात, 'आत्ताच्या संगीतावर पाश्चिमात्य संगीताचा प्रभाव आहे. हा प्रभाव पूर्वीही होता, पण त्यात भारतीय संगीत कधी हरवलं नाही. पूर्वी गरजेपुरतं ते संगीत वापरलं जायचं पण आता उलट झालंय. नवीन ट्रेण्ड येतात आणि लगेचच नाहीसे होतात. आजच्या संगीतातून भारतीय स्वर हरवतो आहे, असं होता कामा नये.' आज पूर्वीइतके ताकदीचे गायक नाहीत याची खंत आजगावकरांना आहे. गाणं समृद्ध होण्यासाठी खूप संगीत ऐकलं पाहिज आणि आत्मसात करता आलं पाहिजे, असा सल्ला ते देतात. पण आत्मसात करणं म्हणजे कॉपी करणं नाही, असंही ते आवर्जून नमूद करतात.

संगीतक्षेत्रातल्या आजगावकरांच्या कारकिर्दीला पन्नास वर्षं झाली असली तरी त्यांची संगीतसाधना आज वयाच्या ७२ व्या वर्षीही अखंड चालू आहे. ही साधना न संपणारी असं ते अभिमानाने सांगतात.

– मनीषा नित्सुरे
manisha.nitsure@timesgroup.com